बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि २२ फेब्रुवारी २०२४

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १०२/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०२/२०२४ रोजी १७.०० वा ते २१.३० वा चे दरम्यान क्रोमा शोरूम येथील पार्किग मध्ये सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०२/२०२४ रोजी २०.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | कुमार महादेव काडा,वय-६० वर्षे,रा-सिध्दरामेश्वर नगर एमआयडीसी अ.कोट रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २५,०००/- रु काळया लाल रंगाची बजाज पल्सर २२० सीसी मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी ई १८५२ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन लावली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीशिवाय, लबाडीने मुद्दाम गाडीचे हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेले आहे म्हणून. तपासः- पोना/१४२२/ढोबळे- ८०८७४०३०५० |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १०३/२०२४ भादवि ३८१ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २०/०१/२०२४ ते दि २३/०१/२०२४ रोजी क्रोमा शोरूम शेजारी असलेल्या गॅस पंप येथे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०२/२०२४ रोजी २१.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संजय वसंतराव बनगाया,वय-३१ वर्षे,रा- एन २,२७/४ सिडको न्यु हनुमान नगर संभाजी नगर |
| **आरोपीचे नाव** | : | विशाल बाबुराव पवार,रा- मनोहर नगर जुनी पोलीस लाईन मुरारजी पेठ सोलापूर |
| **गेला माल** | : | १,०४,०००/- रूपये रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २०/०१/२०२४ ते दि २३/०१/२०२४ रोजी क्रोमा शोरूम शेजारी असलेल्या गॅस पंप येथे झालेल्या एकुण गल्यामधील रकमेपैकी १,०४,०००/- रू यातील नमुद आरोपी मजकूर यांने फिर्यादीचे समंतीवाचुन मुद्दाम लबाडीने चोरी करून घेऊन गेला होता व तो पैसे तो परत करणार आहे असे म्हणाला होता परंतु त्याने पैसे परत दिले नाही म्हणून तक्रार देण्यास विलंब झाला आहे.म्हणून. तपासः- पोह/१२३२/चुंगे- ९५११२९५१४१ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १०४/२०२४ भादवि २७९,३३७,३३८,४२७ सह मोवाकाक १८४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १९/०२/२०२४ रोजी १२.२० वा. बाळे ब्रिज सर्व्हिस रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०/२/२०२४ रोजी २३.५७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुजित श्रीराम शिंदे,वय-४२ वर्षे,रा- ७६,गणेश गौरी हौसिंग सोसायटी बाळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | रणविरसिंग कमलसिंग चौहान,वय-५० वर्षे,रा- १०५/१८६४ कृष्णा नगर अहमदाबाद गुजरात |
| | | |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १९/०२/२०२४ रोजी १२.२० वा. बाळे ब्रिज सर्व्हिस रोडवरून यातील फिर्यादी त्याची पत्नी उषा व दोन लहान मुले हे रिक्षा क्र एमएच १३ सीटी २१७७ यामधुन सर्व्हिस रोडने सोलापूर पुणे हायवे रोडवर जाताना सोलापूर कडून येणारा मालट्रक क्र जीजे ०१ के टी २७५७ चा चालक यातील नमुद अरोपी मजकूर यांने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणाने व हयगयीने चालवून रिक्षाचे मागून धडक दिल्याने त्यात फिर्यादीचा डावा पाय मोडला तसेच रिक्षाचे काच फुटुन तुटुन नुकसान करण्यास कारणीभूत झाला आहे.म्हणून.तपासः- पोह/४८९/बाचावार- |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७१/२०२४ भादवि ४२० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०१/२०२४ रोजी १९.३२ वा ते २०.३४ वा चे दरम्यान साखर पेठ सोलापूर येथील एटीएम मशीन मध्ये सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०२/२०२४ रोजी २२.१५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पराग पांडुरंग उत्पात,वय-३६ वर्षे,व्यवसाय- शाखाधिकारी रा-१६८४ उत्पात गल्ली पंढरपुर ,सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात इसम |
| **फसवणुक रक्कम** | | ३०,०००/- रूपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १०/०१/२०२४ रोजी १९.३२ वा ते २०.३४ वा चे दरम्यान साखर पेठ सोलापूर येथील पंढरपुर अर्बन को.ऑप.बॅक.लि.या एटीएम मशीन मधून एका अज्ञात व्यक्तीने ३ वेळा १०,०००/- रू असे एकूण ३०,०००/- रू काढून एटीएम मशीनची छेडछाड केल्याने त्याच्या खात्यातून सदरचे पैसे डेबिट झालेले दिसून येत नाही सदर तक्रारीबाबत दि १९/०१/२०२४ रोजी सायबर पोलीस ठाणे सोलापूर शहर यांना कळविले असून आज रोजी तक्रार देत आहे.म्हणून.तपासः- पोसई राठोड- **९९६००८२९७५** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६६/२०२४ भादवि ४२०,४०६,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०४/०१/२०२४ रोजी ते आजतागायत पर्यत फिर्यादीचे राहते घरी सृष्टी नगर अ.कोट रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०२/२०२४ रोजी २३.२३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विठ्ठल दत्तात्रय मुनगापाटील,वय-३९ वर्षे,रा-१३८, सृष्टी नगर अ.कोट रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मनिष काळजे २) आकाश मुदगल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की यातील फिर्यादीचे जुने चारचाकी गाडी विक्री करण्याचा व्यवसाय आहे फिर्यादी हे पुणे मुंबई येथून चारचाकी विकत गाडी आणून सोलापूर शहरात विकत असत.<br>दि ०४/०१/२०२४ रोजी ते आजतागायत पर्यत फिर्यादीचे राहते घरी सृष्टी नगर अ.कोट रोड सोलापूर येथे यातील फिर्यादीचे ओळखीचे आरोपी क्र २ यांनी फिर्यादीस अरोपी क्र १ यांना चारचाकी गाडी घ्यावयाची आहे असे सांगितल्यावर फिर्यादीने त्यांच्या जवळील चारचाकी गाडी क्र एमएच ०४ एफ एन ७८७८ हे वाहन यातील दोन्ही आरोपीना फिर्यादीचे घरी दाखविले तेव्हा आरोपी क्र १ यांनी सदर गाडी पसंद आहे असे म्हणून ४ लाख रूपये ला गाडीचा सौदा झाल्या त्यानंतर आरोपी क्र १ यांने सदर ठरलेल्या सौदयापैकी एक लाख रूपये हे अॅडव्हान्स म्हणून दिले उरलेले पैसे दोन दिवसात देतो असे म्हणनू फिर्यादीचा विश्वास संपादन करून फिर्यादीकडील वाहन ताब्यात घेवून व ते वाहन स्वतःचे म्हणून वापरून फिर्यादीची आर्थिक फसवणुक करून दमदाटी केली आहे.म्हणून.तपासः- सपोनि कुकडे- **९५७९३९९५५३** |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ११६/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १९/०२/२०२४ रोजी २०.०० वा ते २२.०० वा चे दरम्यान डफरीन हॉस्पीटल समोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २१/०२/२०२४ रोजी २०.३३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | केदार शरणप्पा कडगंची,वय-२८ वर्षे,रा- मु पो अ.कोट बुधवार पेठ समर्थ मठाजवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | **:** | २५,०००/- रु काळया रंगाची त्यावर सिल्वर लाल पट्टा असलेली हिरो एच एफ डिलक्स मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी एक्स २४६७ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन लावली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीशिवाय, लबाडीने मुद्दाम गाडीचे हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेले आहे म्हणून. तपासः- पोह/४९७/चव्हाण- |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ७८/२०२४ भादवि ३५३,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि २१/०२/२०२४ रोजी १५.१० वा.जोडभावी पोलीस ठाणे गेट समोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २१/०२/२०२४ रोजी २०.२३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | पोना/१३८७/सचिन दिंगबर बाबर,नेम- जोडभावी पेठ पोलीस ठाणे सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) नरसिंग बाळू चव्हाण,२) संजय ऊर्फ संजु बाळु चव्हाण,३) दिलीप देसू राठोड सर्व रा- बक्षी हिप्परगा लमाण तांडा सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी रमेश बाळु चव्हाण यांचे वर एमपीडीए अंतर्गत कारवाई झाल्याने त्यास येरवडा कारागृह पुणे येथे सोडण्याकरीता पोसई पाटोळे व पोलीस मुख्यालय सोलापूर शहर कडील ०१+०३ चे पोलीस गार्ड वाहन क्र एमएच १२ आर वाय ७४२० यामध्य बसवून घेवून जात असताना जोडभावी पेठ पोलीस ठाणे समोर यातील सर्व आरोपीत येऊन वाहनाभोवती घेरटा घालून शासकीय कामात अडथळा केला आहे.म्हणून. तपासः- पोनि चव्हाण-८१०८१०२००३ |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ७५/२०२४ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि २३/०७/२०२२ वा ते दि ०८/११/२०२३ रोजी फिर्यादीचे सासरी विदया नगर शेळगी |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २१/०२/२०२४ रोजी ०२.५९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | भारती वियजेंद्र धोत्रे,वय-२३ वर्षे,रा-मु.पो.तांदुळवाडी ता.दक्षिण सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) वियजेंद्र धोत्रे (पती),२) वंदना विदयासागर धोत्रे (सासू) रा- दोघे विदया नगर शेळगी |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २३/०७/२०२२ वा ते दि ०८/११/२०२३ रोजी फिर्यादीचे सासरी विदया नगर शेळगी येथे फिर्यादी ही नांदत असताना यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी घरातील किरकोळ कारणावरून फिर्यादी सोबत वादविवाद भांडणतंटे करून शिवीगाळ दमदाटी करून हाताने लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच फिर्यादीचा शारीरीक व मानसिक त्रास देवून जाचहाट करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.म्हणून. तपासः- पोना/१३७८/वाघमारे- ९५२७९५१४२८ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ११७/२०२४ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | जुलै २०२२ ते आजतागायत फिर्यादीचे सासरी कोर्सगाव ता.अ.कोट जि सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २१/०२/२०२४ रोजी २३.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सानिया अशपाक बिराजदार,वय-२० वर्षे,रा- कुर्बान हुसेन नगर पोस्ट ऑफिसचे समोर गुरूनानक चौक सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) अशपाक बिराजदार (पती),२) लियाकत बिराजदार (सासरे) ३) समीर बिराजदार (दीर) सर्व रा-कोर्सगाव अ.कोट ४) यासीन बंदेनवाज सय्यद (नणंद) रा- सोरेगाव सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, जुलै २०२२ ते आजतागायत फिर्यादीचे सासरी कोर्सगाव ता.अ.कोट जि येथे फिर्यादी नांदत असताना यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी मिळून फिर्यादीस लग्नात मानपान केला नाही असे म्हणून व लग्नात तुझे आईने सोने घातले नाही असे म्हणून फिर्यादीचे चारित्र्यावर संशय घेवून पटयाने मारहाण करून शिवीगाळ करून तलाख दे असे म्हणून माहेरी हाकलून दिले तसेच अरोपी क्र २ यांनी फिर्यादीस जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे.म्हणून.तपासः- पोह/४२१/इनामदार-८६०५०१०१४१ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ८२/२०२४ भादवि ३२६,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १०/०२/२०२४ रोजी २२.०५ वा. घोडातांडा ता.दक्षिण सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २१/०२/२०२४ रोजी ०१.२४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | मारूती भिमू जाधव,वय-३२ वर्षे,रा- मुपो घोडातांडा ता.दक्षिण सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) राहुल गणपत चव्हाण,२) मणपत चव्हाण रा-घोडातांडा ता.दक्षिण सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे मामाचे किराणा दुकान असून अधून मधून फिर्यादी हा सदर दुकानात बसत असत दि १०/०२/२०२४ रोजी २२.०५ वा.च्या सुमारास विजय गुंडु राठोड यांचे नमुद ठिकाणचे दुकानाचे शटर बंद करीत असताना यातील आरोपी क्र २ यांने फिर्यादीस अरोपी क्र १ यास दुकानातील कोल्ड्रीक्स उधार न दिल्याचे कारणावरून शिवीगाळ करून दोन्ही हात पकडला व आरोपी क्र १ याने त्यांचे हातात आणलेला दगडाने फिर्यादीचे जवळ येऊन फिर्यादीचे डोक्यात मारून गंभीर जखमी केले आहे.म्हणून.तपासः- पोसई गायकवाड. **७०२०२३७५३६** |